२२
साप्ताहीक
RNI No. : MAHMAR2009/28514 www.samajsatta.com
www.samajsatta.com
Mo. : 9049940157

# समाजसत्ता

वर्षे १६ वे | अंक २२ | पुणे, सोमवार, दि. २ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ | मुल्य : २ रु | पान ४

## ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमासाठी सुरक्षा व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात - मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी

**■ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह यांची विशेष उपस्थिती; नवी मुंबईत भव्य कार्यक्रम**

**मुंबई :** ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा भव्य कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईतील खारघर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. देशभरातून लाखो भाविक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाच्या तयारीस गती देत सुरक्षा, पाणीपुरवठा, भोजन, निवास, वाहतूक, स्वच्छता आदी बाबींची चोख व्यवस्था करण्याचे निर्देश मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी दिले.

‘हिंद-दी-चादर’ श्री गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, राजस्थानचे मुख्यमंत्री भजन लाल शर्मा, आसामचे मुख्यमंत्री डॉ. हिमांता बिस्वा सरमा उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी मंत्रालयात बैठक झाली.

यावेळी राज्य समन्वय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, नवी मुंबईचे उपजिल्हाधिकारी तथा कार्यक्रमाचे समन्वयक रविंद्र राठोड, समितीचे शासकीय समन्वयक डॉ. जगदीश सकवान, मुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव तुषार राठोड यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

तर, दूरदृश्य प्रणालीद्वारे कोकण, पुणे, नाशिक विभागाचे आयुक्त, मुंबई शहर, उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबारचे, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक, परिवहन आयुक्त, महानगरपालिकेचे आयुक्त यांच्यासह संबंधीत अधिकारी उपस्थित होते.

प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी म्हणाले की, नागपूर आणि नांदेड येथील कार्यक्रम लाखो भाविकांच्या उपस्थित यशस्वीरित्या झाला आहे. या कार्यक्रमात सिख, सिकलकर,बंजारा, लबाना, सिंधी, महोयाल, वाल्मिकी, उदासीन, भगत नामदेव (वारकी) संप्रदायासह नागरिकही मोठ्या संख्येने गुरू तेग बहादुर यांचा इतिहासाला उजाळा देण्यासाठी एकत्र येतात. नवी मुंबई येथील कार्यक्रमातही दहा लाख भाविक राज्य तसेच देशातून अपेक्षित आहेत. या अनुषंगाने वाहतुक, स्वच्छता, लंगर, पाणी पुरवठा, मैदान, धर्मशाळा, निवासव्यवस्था, पिण्याचे पाणी, सुरक्षा व्यवस्था, फिरते स्वच्छतागृह, नि:शुल्क शटल बससेवा या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

समन्वयक रामेश्वर नाईक म्हणाले की, ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरू तेग बहादुर यांच्या शहीदीच्या स्मृतीस उजाळा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमाअंतर्गत शाळा, महाविद्यालये, निवासी शाळा, शिक्षण संस्था येथे विद्यार्थ्यांमार्फत प्रभातफेरी काढण्यात येते, घोषवाक्य, निबंध स्पर्धा तसेच डॉक्युमेंट्री बनविण्यात येणार आहे. सतिंदर सरताज यांचे भक्तिगीत सिनेमागृहात प्रदर्शीत करण्यात येत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये डिजिटल प्रचार रथ, संत प्रवास वाहने, जागरण, प्रचार व प्रसार समित्या यांच्यामार्फत गुरू तेग बहादुर आणि त्यांच्या परिवाराच्या शहीदीचा इतिहास जनमानसात पोहोचविण्यात येत आहे.

https://gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर कार्यक्रमाची संपुर्ण माहिती देण्यात आली आहे. नऊ समाज या कार्यक्रमाच्यानिमित्ताने एकत्र येत असून, या कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या कार्यक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहनही त्यांनी केले.

## ‘सीआयएसएफ’ कडून रत्नागिरीत ‘वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन-२०२६’चे आयोजन

**■ उपक्रमाचा आरंभ उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते**

मुंबई, दि. ४ : देशातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) आपल्या ५७ वर्षांच्या गौरवशाली सेवेचे औचित्य साधत १४ फेब्रुवारी २०२६ रोजी रत्नागिरी येथील पोलीस मैदानावर ‘वंदे मातरम् कोस्टल सायक्लोथॉन-२०२६’ या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा आरंभ उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

### किनारी व सागरी सुरक्षेबाबत जनजागृती

या सायक्लोथॉनचा उद्देश किनारी व सागरी सुरक्षेबाबत जनजागृती, राष्ट्रीय एकात्मता, तंदुरुस्ती, पर्यावरण संवर्धन आणि महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे हा आहे. विशेष बाब म्हणजे या मोहिमेत ५० टक्के महिला सहभागी आहेत.

या सायक्लोथॉनद्वारे किनारी भागातील नागरिकांमध्ये राष्ट्रीय सुरक्षेचे भान निर्माण करणे, नागरिक व ‘सीआयएसएफ’ यांच्यात समन्वय वाढवणे, तरुण पिढीला अमली पदार्थांच्या धोक्यांबाबत जागरूक करणे आणि बंदर सुरक्षेतील ‘सीआयएसएफ’च्या ५१ वर्षांच्या अनुभवाची माहिती देणे हा उद्देश आहे.

१९६९ मध्ये स्थापन झालेल्या ‘सीआयएसएफ’ने गेल्या ५७ वर्षांत रिफायनरीज, विमानतळ, बंदरे, मेट्रो रेल्वे, अणुऊर्जा प्रकल्प, अंतराळ केंद्रे यांसह देशाच्या अनेक सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या आस्थापनांची सुरक्षा सक्षमपणे सांभाळली आहे. सुरक्षेपुरतेच नव्हे तर जनजागृती, सामाजिक उपक्रम आणि सार्वजनिक सुरक्षिततेच्या कार्यक्रमांद्वारे सीआयएसएफ राष्ट्रीय सेवेची बांधिलकी जोपासत आहे.

### ६,६०० किलोमीटरचा प्रवास

‘वंदे मातरम्’ या देशभक्तीपर गीताच्या १५० वर्षांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या कोस्टल सायक्लोथॉनमध्ये देशाच्या पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवरून तब्बल ६,६०० किलोमीटरचा प्रवास करण्यात येणार असून, या उपक्रमाचा समारोप कोची येथे होणार आहे. मागील वर्षीच्या सायक्लोथॉन-२०२५ ला ३० लाखांहून अधिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता, तर २.९ कोटी डिजिटल संवाद नोंदविण्यात आले होते.

## लाळ खुरकत रोगाच्या निर्मुलनासाठी लसीकरण हाय प्रभावी उपाय

**■ पशुसंवर्धन विभागाचे आवाहन**

**पुणे :** लाळ खुरकत रोग हा गाय, म्हैस, शेळी व मेंढ्यांमधील अत्यंत संसर्गजन्य विषाणूजन्य रोग असून त्याचा पशुधन उत्पादन व निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होतो. या रोगाच्या नियंत्रण व निर्मूलनासाठी केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २०३० पर्यंत लसीकरणाद्वारे लाळ खुरकत व सांसर्गिक गर्भपात हे दोन रोग निर्मूलनाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. राज्यात १४ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लाळ खुरकत लसीकरण फेरी-७ यशस्वीपणे पार पडली असून १५९ लक्ष गो व म्हैस वर्गीय पशुधनांपैकी १५३ लक्ष पशुधनांना लसीकरण करण्यात आले आहे. लाळ खुरकत रोगाचे संपूर्ण निर्मूलन होण्यासाठी दर सहा महिन्यांनी लसीकरण करणे आवश्यक आहे. त्यानुसार १३ फेब्रुवारी ते २९ मार्च २०२६ या कालावधीत लाळ खुरकत लसीकरण फेरी-८ राबविण्यात येणार असून आवश्यक लस व साधनसामग्रीचा पुरवठा केंद्र शासनामार्फत करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या मानक कार्यप्रणालीनुसार पंचायती राज संस्था, शहरी स्थानिक संस्था, सहकारी दुग्ध संस्था, स्वयंसेवी संस्था, खाजगी पशुवैद्यक व पशुपालकांच्या सक्रिय सहभागातून ही मोहिम राबविण्यात येणार आहे. पशुंचे आरोग्य जपण्यासाठी, रोगप्रसार रोखण्यासाठी व पशुपालकांचे संभाव्य आर्थिक नुकसान टाळण्यासाठी सर्व पशुपालकांनी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधून आपल्या पशुधनाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. आणि आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

## खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ जलदगतीने मिळण्याच्यादृष्टीने ब्लॉकचेन तंत्रज्ञान वापर करण्यास मान्यता

**■ क्रीडा संघटनांनी ब्लॉकचेन प्रणालीवर विहीत मुदतीत माहिती अपलोड करावी- जिल्हा क्रीडा अधिकारी**

पुणे, दि. ३: गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय व निमशासकीय सेवेतील ५ टक्के आरक्षणाचा लाभ पारदर्शक व जलद आणी त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा ब्लॉकचेन व कृत्रीम बुद्धीमत्ता अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ८ जानेवारी २०२६ रोजीच्या शासन निर्णयाने मान्यता देण्यात आली आहे.

ब्लॉकचेन व कृत्रीम बुद्धीमत्ता या प्रणालीचा लाभ तळागाळातील खेळाडूपर्यंत पोहोचण्यासाठी शासन निर्णयातील निर्देशाप्रमाणे प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. यादृष्टीन पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

क्रीडा संघटनेने करावयची कार्यवाही: राज्य व राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी अभिलेख जतनाकरिता स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी आणी गुणपत्रिका विहित नमुन्यात श्री फाईल क्रीडा ई प्रमाण प्रणालीवर (https://sports.maharashtra.gov.in/) वर अपलोड करण्यासाठी संचालनालयास सादर करणे क्रीडा संघटनावर बंधनकारक आहे. ही माहिती संबधीत संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांने डीजीटल स्वाक्षरीने प्रमाणित करणे आवश्यक आहे. विहित मुदतीत माहिती ‘ब्लॉक चेन’वर अपलोड न करणाऱ्या संघटना स्मार्ट कॉन्टॅक्टद्वारे स्वंयचलीतरित्या डिफॉल्टर यादीत समाविष्ट करण्यात येणार आहे. अशा परिस्थितीत खेळाडूंचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या संघटनेची राहील.

खेळाडूच्या नोंदणी प्रक्रियेकरिता विशेष मोहीम: खेळाडूंनी आपल्या ‘क्रीडा ई प्रमाण’ प्रणालीवर (https://sports.maharashtra.gov.in/) आपल्या आधार संलग्न आयडीद्वारे लॉगीन करुन नोंदणी करणे अनिवार्य आहे. खेळाडूंनी सादर केलेली माहिती आणी संघटनेने ब्लॉकचेनवर अपलोड केलेला, हॅश यांची प्रणालीद्वारे स्वंयचलीत पडताळणी होणार आहे. त्यामुळे खेळाडूंना यापुढे पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही.

अपिलीय तरतूद: तांत्रिक कारणास्तव एखाद्या खेळाडूचे प्रमाणपत्र नांमजूर झाल्यास तक्रार करण्याची व तक्रारी नंतरही खेळाडूस प्रमाणपत्र न मिळाल्यास ३० दिवसांच्या आत ऑनलाईनपद्धतीने अपील करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

शासन निर्णयान्वये जुनी कागदपत्रावर आधारीत पडताळणी प्रक्रिया बंद करुन पुर्णत: डिजीटल क्रीडा ई प्रमाणपत्र प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाच्या लाभ मिळण्याच्यादृष्टीने क्रीडा संघटनांनी ब्लॉकचेनवर विहीत मुदतीत माहिती अपलोड करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केले आहे.

## मातोश्री रमाई आंबेडकर आश्रम शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**उरुळी कांचन (प्रतिनिधी): ( सुनील तुपे )**

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे वार्षिक स्नेहसंमेलन हे शैक्षणिक जीवनातील अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन लोकमतचे पत्रकार सहदेव खंडागळे यांनी केले. मातोश्री रमाई आंबेडकर प्राथमिक व माध्यमिक निवासी आश्रम शाळेत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले, त्यावेळी ते बोलत होते.

पुस्तकी शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला, छंद आणि सर्जनशील उपक्रम जोपासावेत, तसेच परंपरा, संस्कृती, संस्कार व गुरुजनांचा आदर या मूल्यांचे कटाक्षाने पालन झाले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या स्नेहसंमेलनात शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी सादर केलेली विविध नृत्ये, गायन, वादन व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणातून विद्यार्थ्यांचा



आत्मविश्वास, कला आणि मेहनत स्पष्टपणे दिसून आली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आचल कन्स्ट्रक्शन पुणेचे सर्वेसर्वा विशाल कप्तान परदेशी, पी.आय. चक्रे साहेब, सामाजिक कार्यकर्त्या अश्विनीताई वाघ, बिवारी गावच्या सरपंच उत्कर्षा गोते, सनलाईट स्कूलचे बापूसाहेब शिंदे, इतिहास संशोधक खलिल शेख, शाळेचे सल्लागार सुनील तुपे, पत्रकार अमोल भोसले, संस्थेचे सचिव कादर शेख, उद्योजक शिवाजी मामा चव्हाण, संचालक आवेज शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या प्राचार्या शबाना शेख यांनी केले, तर सूत्रसंचालन रोहिदास बिचकुले यांनी प्रभावीपणे केले.

वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त कलागुणांना मंच मिळतो आणि पालकांना आपल्या मुलांमधील गुणवत्ता ओळखण्याची संधी मिळते, असे मत केसरी चे पत्रकार अमोल भोसले यांनी व्यक्त केले. खेळाडू असो वा कलाकार, त्याच्या प्रवासाची सुरुवात ही शालेय स्नेहसंमेलनातूनच होते, असे प्रतिपादन दख्खन इतिहास संशोधक संस्थेचे विश्वस्त खलिल शेख यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक अमोल शिंदे, प्रवीण कांबळे, शिवराज साने, वासुदेव बारी, मीना खंडागळे, जयश्री बळवंत, माधुरी सुपेकर, शकील शेख, तसेच विद्यार्थी व पालकांनी मोलाचे सहकार्य केले.

समाज सत्ता

■ वर्षे १६ वे ■ अंक २२ ■ पुणे, सोमवार, दि. २ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२६



## संपादकीय

# महिलांचा आदर महत्त्वाचा

सर्वोच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२६ रोजी एका ऐतिहासिक निर्णयाद्वारे देशातील सर्व शाळांसाठी नवीन आणि कडक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. न्यायालयाने संविधानाच्या कलम २१ अंतर्गत मासिक पाळीच्या स्वच्छतेला 'जीवनाच्या हक्काचा' भाग म्हणून मान्यता दिली आहे. देशभरातील इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणा-या मुलींना मोफत सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निर्णय दिला आहे. मासिक पाळीच्या काळात मुलींच्या आरोग्य, स्वच्छता आणि शिक्षणाच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने हा आदेश देण्यात आला असून सर्व सरकारी आणि खासगी शाळांमध्ये ही सुविधा अनिवार्य करण्यात आली आहे. मध्य प्रदेशातील सामाजिक कार्यकर्त्या जया ठाकूर यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हे निर्देश दिले. या याचिकेत शाळांमध्ये शिकणा-या मुलींना मोफत सॅनिटरी पॅड देण्याची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणाची सुनावणी न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठासमोर झाली. सर्वोच्च न्यायालयाने सर्व राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना स्पष्ट आदेश दिले की, देशातील सर्व सरकारी तसेच खासगी शाळांमध्ये इयत्ता सहावी ते बारावीमधील मुलींना मोफत सॅनिटरी पॅड किंवा मासिक पाळीसंबंधित उत्पादने उपलब्ध करून द्यावीत. यासाठी स्वतंत्र आणि प्रभावी धोरण तयार करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. न्यायालयाने केंद्र सरकारला देखील राष्ट्रीय स्तरावर धोरण आखण्यास सांगितले आहे. शाळांमधील मुलींना मोफत सॅनिटरी पॅड देण्याबाबत एकसंध राष्ट्रीय धोरण असावे, जेणेकरून देशभरात समान अंमलबजावणी होईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले तसेच राज्ये व केंद्र शासित प्रदेशांनी मासिक पाळीच्या काळात स्वच्छतेसाठी चालवण्यात येणा-या योजनांची माहिती केंद्र सरकारला द्यावी, असेही निर्देश दिले. या निर्णयात केवळ सॅनिटरी पॅडपुरते मर्यादित न राहता, शाळांतील मूलभूत सुविधांवरही भर देण्यात आला आहे. सर्व शाळांमध्ये वेगवेगळ्या लिंगांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे असणे बंधनकारक असल्याचे न्यायालयाने सांगितले. यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजांचा विचार करून सुविधा उपलब्ध करून देण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक शाळेत 'मासिक पाळी स्वच्छता व्यवस्थापन कॉर्नर' उभारण्याचे आदेश देण्यात आले असून, तेथे आवश्यक सर्व साहित्य उपलब्ध असणे गरजेचे आहे. सॅनिटरी पॅडस् बायोडिग्रेडेबल असावेत आणि ते व्हेंडिंग मशिनद्वारे किंवा शाळेतील अधिकृत कर्मचा-यांमार्फत वितरित करण्यात यावेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या सर्व निर्देशांची अंमलबजावणी कशी केली जात आहे, याचा सविस्तर कृती अहवाल तीन महिन्यांच्या आत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याचे आदेश राज्य सरकारांना देण्यात आले आहेत. निर्देशांचे पालन न झाल्यास संबंधित प्रशासनावर जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही न्यायालयाने दिला आहे. हा निर्णय शाळकरी मुलींच्या आरोग्य सन्मान आणि शिक्षणाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांकडून व्यक्त करण्यात येत आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रत्येक शाळेत मग ती सरकारी असो की खासगी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे असणे आवश्यक आहे. या प्रसाधनगृहांना नियमित पाणीपुरवठा असावा. नव्याने बांधण्यात येणारी तसेच विद्यमान सर्व प्रसाधनगृहे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य असावीत आणि त्यामध्ये दिव्यांग मुलांच्या गरजांचा विशेष विचार करण्यात यावा. प्रसाधनगृहामध्ये हात धुण्यासाठी सुविधा असणे बंधनकारक असून, साबण आणि पाणी नेहमी उपलब्ध असावे असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आपल्या शिक्षण व्यवस्थेने आतापर्यंत मुलींच्या मूलभूत गरजा समजून घेण्यात अपयशी ठरल्याची कबुली दिली आहे. याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला होता की, मासिक पाळी ही एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया आहे आणि मासिक पाळीशी संबंधित स्वच्छता सुविधा प्रदान करणे ही राज्याची जबाबदारी असली पाहिजे. मासिक पाळीच्या स्वच्छतेच्या अभावामुळे लाखो मुलींना शाळा सोडण्यास भाग पाडले जाते ही वस्तुस्थिती आहे. न्यायालयाच्या भूमिकेवरून असे दिसून येते की, न्यायालय सामाजिक संवेदनशीलता समजून घेताना अधिकारांचे संतुलन राखू इच्छिते. शाळांमध्ये मुलींना सन्माननीय वातावरण प्रदान करणे आवश्यक आहे. आजही देशातील अनेक भागामध्ये मुलींना मासिक पाळीच्यावेळी कापड वापरण्यास भाग पाडले जाते, कारण शाळा मोफत पॅड देत नाहीत अथवा वापरलेल्या पॅडची सुरक्षित विल्हेवाट लावत नाहीत. न्यायालयाच्या टिप्पण्या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकणा-या आहेत. शैक्षणिक संस्था आणि कामाच्या ठिकाणी मासिक पाळीला ज्या पद्धतीने वागवले जाते ती त्रासदायक मानसिकता दर्शवते. मुलींचा सन्मान केवळ आदराचा प्रश्न नाही, तो समाजाच्या संवेदनशीलतेची आणि शिक्षणाच्या समानतेची परीक्षा घेणारा आहे. शाळांमध्ये मासिक पाळीसाठी मूलभूत सुविधा देणे ही आता गरज नाही, तर अधिकार आहे. मासिक पाळीच्या कारणामुळे जर एखादी मुलगी शाळेत जाऊ शकत नसेल तर त्यासाठी मुलगी जबाबदार नसून संपूर्ण व्यवस्था आणि समाजाची मानसिकता जबाबदार आहे. शाळांप्रमाणेच रेल्वे आणि विमानांसारख्या सार्वजनिक प्रवास व्यवस्थेतही महिलांसाठी मोफत सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून द्यावेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या दिशादर्शक निर्णयामुळे आगामी काळात सार्वजनिक ठिकाणीही अशा सुविधा मिळतील अशी आशा. मासिक पाळी ही केवळ आरोग्याची समस्या नसून दारिद्र्य, माहितीची कमतरता, पाणीटंचाई, स्वच्छतागृहांचा अभाव आणि सामाजिक कलंक यांचा एकत्रित परिणाम आहे. शिवाय महिलांच्या स्वाभिमानाचा तो प्रश्न आहे.

# 'टॅरिफ'साहेब थंडावले!

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंधांना कलाटणी देणारी घडामोड घडली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लादण्यात आलेल्या आयात शुल्कात (टॅरिफ) मोठी कपात करण्याची अधिकृत घोषणा केली आहे. ही घोषणा केवळ दोन देशांमधील चर्चेचा विषय नसून जागतिक बाजारपेठेवर दूरगामी परिणाम करणारा निर्णय मानला जात आहे. तरीही भारताने सावध रहायला हवे, कारण ट्रम्प यांची चालचलन 'लहरी राजा'सारखी असते. ट्रम्प यांनी समाजमाध्यमाद्वारे जाहीर केल्यानुसार, भारतीय उत्पादनांवर आकारले जाणारे २५ टक्के आयात शुल्क आता १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या नव्या कररचनेची अंमलबजावणी 'तत्काळ प्रभावाने' लागू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात झालेल्या सविस्तर दूरध्वनी संभाषणानंतर हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. भारतीय निर्यातदारांसाठी ही बातमी अत्यंत दिलासादायक असून यामुळे अमेरिकन बाजारपेठेत भारतीय वस्तूंना मोठी मागणी मिळण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांनी या निर्णयाची जाहीर घोषणा केली असली तरी भारत सरकारकडून यावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. ट्रम्प यांच्या विधानानुसार हा एक द्विपक्षीय व्यापार कराराचा भाग असला तरी भारत सरकारने यातील तांत्रिक बाबी आणि अटींबाबत सावध पवित्रा घेतल्याचे दिसते. जोपर्यंत वाणिज्य मंत्रालय अथवा पंतप्रधान कार्यालयाकडून याबाबत अधिकृत पत्रक प्रसिद्ध होत नाही,

तोपर्यंत या करारातील बारकाव्यांबाबत अनिश्चितता कायम आहे. हा निर्णय केवळ कर कपातीपुरता मर्यादित नसून भारत-अमेरिका यांच्यातील धोरणात्मक भागीदारीचा एक महत्त्वाचा भाग आहे. अमेरिकेने टॅरिफ कमी केल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला बळ मिळणार असले तरी त्या बदल्यात भारतालाही काही व्यापारी सवलती द्याव्या लागू शकतात. या करारामुळे भारतीय उद्योगांना नेमका किती फायदा होणार हे लवकरच स्पष्ट होईल. भारत-अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंधांमध्ये प्रदीर्घ काळापासून जाणवणारा तणाव आता निवळण्याची चिन्हे दिसत असून दोन्ही देशांमध्ये एका ऐतिहासिक व्यापारी करारावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. ट्रम्प यांच्या अधिकृत घोषणेमुळे भारतीय उत्पादनांवर लादण्यात आलेल्या करांच्या ओझ्यातून (टॅरिफ) भारताला मोठा दिलासा मिळाला आहे. या नव्या करारानुसार भारतीय वस्तूंवर पूर्वी आकारला जाणारा ५० टक्के कर आता १८ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात आला आहे.

यापूर्वी भारताला अमेरिकेकडून ५० टक्के इतक्या प्रचंड कराचा सामना करावा लागत होता. या कराची रचना दोन भागात विभागलेली होती. यामध्ये २५ टक्के 'रेसिप्रोकल टॅरिफ'(परस्पर कर) आणि भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी सुरू ठेवल्यामुळे अमेरिकेने दंडात्मक कारवाई म्हणून लावलेल्या २५ टक्के अतिरिक्त टॅरिफचा समावेश होता. रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताने घेतलेल्या स्वतंत्र भूमिकेमुळे अमेरिकेने हे कठोर आर्थिक निर्बंध लादले होते. आता झालेल्या नव्या करारानुसार अमेरिकेने २५ टक्क्यांचा अतिरिक्त दंड पूर्णपणे मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. रशिया-युक्रेन युद्धानंतर जागतिक तेल बाजारपेठेत निर्माण झालेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर भारताने आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेतला. रशियाकडून होणा-या तेल आयातीला पर्याय म्हणून भारताने दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलाकडून खनिज तेलाची खरेदी करण्याचा निर्णय घेतला. भारताच्या या निर्णयाचे जागतिक स्तरावर, विशेषत: अमेरिकेच्या व्यापार धोरणावर सकारात्मक पडसाद उमटताना दिसत आहेत.

भारताने रशियावरील अवलंबित्व कमी करून व्हेनेझुएलाकडे वळवलेल्या पावलामुळे अमेरिकेने भारतावर लादलेल्या अतिरिक्त करांमध्ये कपात करण्याची भूमिका घेतली आहे. गत काही काळापासून भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात सवलतीच्या दरात तेल खरेदी करत होता. मात्र, आंतरराष्ट्रीय निर्बंध आणि बदलत्या भौगोलिक परिस्थितीमुळे भारताने आपल्या तेलाच्या स्रोतांचे विविधीकरण करण्यास सुरुवात केली. व्हेनेझुएलामध्ये जगातील सर्वांत मोठे तेलसाठे उपलब्ध आहेत. तेथून तेल आयात केल्यामुळे भारताला केवळ स्वस्त इंधन मिळणार नाही, तर अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रासोबतचे व्यापार संबंध अधिक सुदृढ होण्यास मदत होणार आहे. अमेरिकेने आयात शुल्कात केलेली ७ टक्क्यांची कपात भारतीय अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कराचा बोजा कमी झाल्यामुळे अमेरिकेसोबत होणा-या इतर व्यापारातही सुलभता येण्याची शक्यता आहे.

रशियाकडून तेल न घेता व्हेनेझुएलाला पसंती दिल्याने भारताने एकाच वेळी दोन उद्दिष्टे साध्य केली आहेत. या करारामुळे भारत आणि अमेरिका या दोन मोठ्या लोकशाही देशांमधील व्यापार क्षेत्रातील अडथळे दूर झाले आहेत. टॅरिफ ५० टक्क्यांवरून थेट १८ टक्क्यांवर आल्यामुळे अमेरिकन बाजारपेठेत भारतीय मालाची स्पर्धात्मकता वाढणार आहे. विशेषत: सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांतील (एमएसएमई) निर्यातदारांना याचा मोठा लाभ होणार असून, त्यांच्या नफ्याचे प्रमाण वाढण्यास मदत होईल. प्रदीर्घ काळ चाललेल्या राजनैतिक चर्चेनंतर हा तोडगा निघाल्याने दोन्ही देशांतील व्यापारी समुदायामध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या निर्णयामुळे केवळ व्यापारी तूट कमी होण्यास मदत होणार नाही, तर भारत-अमेरिका यांच्यातील सामरिक भागीदारीही अधिक मजबूत होणार आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्यामुळे लागलेला दंड रद्द करणे, हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आणि जागतिक स्तरावरील वाढत्या प्रभावाचा मोठा विजय मानला जात आहे. या करारामुळे अमेरिकेने भारतीय बाजारपेठेची गरज आणि महत्त्व मान्य केल्याचे स्पष्ट होत असून, आगामी काळात दोन्ही देशांमधील आयात-निर्यात अधिक सुलभ आणि वृद्धिंगत होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

व्हाईट हाऊसच्या दाव्यानुसार रशियाकडून कच्च्या तेलाची आयात केल्यामुळे भारतावर लादण्यात आलेला कठोर दंडात्मक कर अमेरिकेने पूर्णपणे रद्द केला आहे. नव्याने लागू करण्यात आलेल्या टॅरिफ रचनेमुळे भारताला दक्षिण-पूर्व आशियाई आणि शेजारील निर्यातदार देशांच्या तुलनेत मोठे व्यापारी प्राधान्य मिळाले आहे. सध्याच्या आकडेवारीनुसार इंडोनेशिया, बांगलादेश आणि व्हिएतनाम यासारख्या देशांच्या उत्पादनांवर अमेरिकेत जो कर आकारला जातो, त्यापेक्षा भारतीय मालावरील कर आता खूपच कमी झाला आहे. त्यामुळे इतर आशियाई देशांच्या तुलनेत भारतीय उत्पादनांना अधिक मागणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# 'अल्कराझ पर्व'!

लॉन टेनिस जगतात आता स्पेनच्या कार्लोस अल्कराझ पर्वाला प्रारंभ झाला आहे. टेनिसचे वर्तमान आणि भविष्य म्हणून पाहिले जात असलेल्या स्पेनच्या कार्लोस अल्कराझने नवइतिहास रचताना सर्वांत कमी वयात चारही ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकण्याची (करियर स्लॅम) किमया साधली आहे. रविवारी झालेल्या अंतिम लढतीत अल्कराझने आपला आदर्श राफेल नदालच्या उपस्थितीत सर्बियाच्या नोव्हाक जोकोविचचा ४ सेटमध्ये पराभव केला आणि कारकिर्दीत प्रथमच ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेचे जेतेपद पटकावले. टेनिस इतिहासातील सर्वकालीन सर्वोत्कृष्ट खेळाडूंपैकी एक जोकोविच आणि युवा पिढीतील तारांकित टेनिसपटू अल्कराझ यांच्यातील झुंज पाहणे ही एकप्रकारची मेजवानीच ठरणार होती. जोकोविचने पुरुष एकेरीत आतापर्यंत २४ ग्रँडस्लॅम जेतेपदे पटकावली आहेत त्यामुळे रविवारी आणखी एक जेतेपद जिंकून २५ एकेरी ग्रँडस्लॅम जेतेपदे मिळवणारा टेनिसपटू असा इतिहास रचण्याची ३८ वर्षीय जोकोविचला संधी होती. यामुळे अंतिम लढतीत जोकोविचचे पारडे जड वाटत होते.

नोव्हाकला २५ ग्रँडस्लॅम जिंकण्याचा मान मिळाला असता. महिलांमध्ये असा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या मार्गारेट कोर्टने केला आहे. स्पेनच्या अल्कराझलाही ऐतिहासिक कामगिरी खुणावत होती. २२ वर्षीय अल्कराझने आतापर्यंतच्या आपल्या कारकिर्दीत फ्रेंच, विम्बल्डन आणि अमेरिकन या ३ ग्रँडस्लॅम स्पर्धा प्रत्येकी २ वेळा जिंकल्या आहेत मात्र, ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेने त्याला हुलकावणी दिली होती. यंदा त्याने ऑस्ट्रेलियन स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. यामुळे मेलबर्न पार्कवर ही स्पर्धा जिंकून तो 'करिअर स्लॅम' पूर्ण करणारा सर्वांत युवा टेनिसपटू ठरणार का? याबाबत चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता होती. जोकोविच या स्पर्धेत या आधी १० वेळा अंतिम लढतीत खेळला होता आणि प्रत्येक वेळी तोच विजेता ठरला होता. यंदा मात्र जोकोविचला जेतेपदापासून वंचित राहावे लागले.

अल्कराझविरुद्ध पहिला सेट जिंकूनही नोव्हाकला कामगिरीत सातत्य राखता आले नाही. नव्या दमाच्या अल्कराझने त्याला अंतिम लढतीत २-६, ६-२, ६-३, ७-५ असे ४ सेटमध्ये पराभूत केले. सुमारे ३ तास चाललेल्या अंतिम लढतीत प्रत्येक गुणासाठी दोन्ही टेनिसपटूत चुरस दिसून येत होती. दोघेही आपापली सर्व्हिस राखण्यासाठी जीवाची बाजी लावत होते. टेनिसमध्ये स्वत:ची सर्व्हिस राखण्याला अतिशय महत्त्व असते. सर्व्हिस गमावली तर गेम गमावण्याचा धोका असतो. सामन्यात 'ॲडव्हान्टेज' मिळवण्यालाही महत्त्व असते. म्हणजे सर्व्हिस करणा-या विरुद्ध गेममध्ये ४०-४० अशा बरोबरीनंतर तुम्हाला ॲडव्हान्टेज मिळाला असल्यास आणि पुढचा गुण तुम्हीच जिंकल्यास तुम्हाला एका गेमचा आगाऊ लाभ मिळतो आणि ही सर्व्हिस करणा-यासाठी धोक्याची घंटा असते. नोव्हाक-कार्लोस यांच्यातील अंतिम लढतीत 'ॲडव्हान्टेज'चे प्रसंग अनेक वेळा आले. दोन्ही खेळाडूंनी दीर्घ रॅलिजवर अधिक भर दिला होता.

कारण अंतिम फेरी गाठण्यापूर्वी उपान्त्य फेरीत त्यांची दमछाक झाली होती. अल्कराझने ५ तास २७ मिनिटे चाललेल्या उपान्त्य लढतीत जर्मनीच्या अॅलेक्झांडर झ्वेरेव वर ६-४, ७-६ (७-४), ६-७ (३-७), ६-७ (४-७), ७-५ अशी मात केली होती. दुस-या उपान्त्य लढतीत जोकोविचला सिन्नेरविरुद्ध विजयासाठी ४ तास ९ मिनिटे झगडावे लागले होते. नोव्हाकने २ वेळा पिछाडीवरून पुनरागमन करताना बाजी मारली होती. त्याने ही लढत ३-६, ६-३, ४-६, ६-४, ६-४ अशी जिंकली होती. यंदाच्या स्पर्धेत महिला एकेरीत कझाकस्तानच्या एलिना रायबाकिनाने माजी विजेत्या अग्रमानांकित अरिना सबालेन्कावर मात केली. एलिनाने ३ वर्षापूर्वीच्या अंतिम लढतीत झालेल्या पराभवाची परतफेडही केली. अंतिम लढतीत सबालेन्कावर ६-४, ४-६, ६-४ असा विजय मिळवत रायबाकिना 'टेनिस राणी' ठरली. यंदा पुरुष एकेरीच्या अंतिम लढतीत सर्बियाच्या जोकोविचचा झंजावात रोखत स्पेनच्या कार्लोस अल्कराझने मेलबर्न पार्कवर नव्या अध्यायाची नोंद केली आणि ऑस्ट्रेलियन ओपनच्या पहिल्यावहिल्या जेतेपदाला गवसणी घातली. कार्लोसचे हे कारकिर्दीतील सातवे ग्रँडस्लॅम विजेतेपद.

अंतिम सामना ४ सेटपर्यंत चालला. पहिला सेट गमावल्यानंतरही नंतरचे ३ सेट जिंकत कार्लोसने जेतेपदावर आपले नाव कोरले. अल्कराझने अंतिम लढत २-६, ६-२, ६-३, ७-५ अशी जिंकली. या पराभवामुळे जोकोविचचे कारकिर्दीतील २५ वे ग्रँडस्लॅम जेतेपदाचे स्वप्न अधुरे राहिले. अंतिम सामना जिंकत कार्लोसने विश्वविक्रमाला गवसणी घातली. कार्लोसने कारकिर्दीतील चारही ग्रँडस्लॅम जिंकत इतिहासातील सर्वांत तरुण 'करिअर स्लॅम' विजेता होण्याचा मान मिळवला. कार्लोसने वयाच्या २२ व्या वर्षी करिअर स्लॅम पूर्ण केले आहे. या आधी रॉड लेव्हर (२४ वर्षे ३२ दिवस), राफेल नदाल (२४ वर्षे १०२ दिवस), रॉजर फेडरर (२७ वर्षे ३०३ दिवस), नोव्हाक जोकोविच (२९ वर्षे १५ दिवस) आणि आंद्रे आगासी (२९ वर्षे ६८ दिवस) यांनी असा मान मिळवला आहे. कार्लोस अल्कराझने २२ व्या वर्षी (२२ वर्षे २७२ दिवस) हा मान मिळवला आहे. अंतिम लढतीत कार्लोस आणि नोव्हाकच्या फिटनेस आणि स्टॅमिनाचा कस लागला.

दोघांनाही उपान्त्य लढतीत घाम गाळावा लागल्याने अंतिम लढतीत दोघांच्याही हालचालींवर आणि कोर्टवरील चपळाईवर थोड्याशा मर्यादा आल्याचे जाणवले. अल्कराझने दुसरा सेट ६-२ असा जिंकला; पण त्याला तिस-या आणि चौथ्या सेटमध्ये जोकोविचचा कडवा प्रतिकार सहन करावा लागला मात्र युवा अल्कराझने जोकोविचचे आक्रमक फटके अफलातून चपळाईने परतवून लावले त्यामुळे अनुभवी नोव्हाकला सतत प्रचंड दबावाखाली राहावे लागले. दोघांनीही खिलाडूवृत्तीचे शानदार प्रदर्शन केले. कार्लोसच्या विजयानंतर त्याचे अभिनंदन करताना नोव्हाक म्हणाला, तुझ्या कामगिरीचे वर्णन करण्यासाठी 'ऐतिहासिक, अभूतपूर्व' असेच शब्द वापरावे लागतील. भविष्यातील वाटचालीसाठी तुला शुभेच्छा! अल्कराझ प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाला, मला सर्वप्रथम नोव्हाकबाबत बोलायला आवडेल तू केवळ टेनिसपटूच नाही तर सर्वच खेळाडूंसाठी आदर्श आहेस. मीसुद्धा याला अपवाद नाही. तुझ्याविरुद्ध खेळताना मजा आली! म्हणजे खेळात हार-जीत ही चालतच असते; पण खिलाडूवृत्ती ही सर्वांत महत्त्वाची!

मराठी साप्ताहिक समाज सत्ता के मुद्रक : राजेश सुकलाल धिवर तथा प्रकाशक : राजेश सुकलाल धिवर द्वारा के पक्ष में श्री समर्थ प्रिटंर्स, आप्पा बळवंत चौक, प्रभात थिएटर के पास, ५३५, शनिवार पेठ, पुणे ४११०३० महाराष्ट्र से मुद्रित तथा बी-२१/५०३, सेक्टर १२, प्लॉट नं. बी-१, पी.एम.आर.डी.ए., भोसरी, पिंपरी चिंचवड कार्पोरेशन, ता. हवेली, जि. पुणे ४११०१८ महाराष्ट्र से प्रकाशित, संपादक राजेश सुकलाल धिवर

Mob.: 9049940157 E-Mail- samajsattagmail.com, RNI NO. M-HM-R/2009/28514 (सर्व वादविवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)

समाजसत्ता
३
पिंपरी - चिंचवड परिसर
▪ वर्षे १६ वे ▪ अंक २२ ▪ पुणे, सोमवार, दि. २ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२६





# महापौरपदी रवि लांडगे यांची बिनविरोध निवड

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराच्या सत्तावीसाव्या महापौरपदी भाजपचे रवि लांडगे यांची आज (शुक्रवारी) बिनविरोध निवड झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने महापौरपदासाठी अर्ज दाखल केला नव्हता. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी लांडगे यांची महापौरपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली काळभोर यांनी उपमहापौरपदासाठी भरलेला अर्ज मागे घेतला. त्यामुळे उपमहापौरपदी भाजपच्या शर्मिला बाबर यांचीही बिनविरोध निवड झाली.

महापौर, उपमहापौरपदासाठी सोमवारी (२ फेब्रुवारी) उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. भाजपकडून प्रभाग सहा धावडेवस्तीमधून दुसऱ्यांदा बिनविरोध निवडून आलेल्या रवि लांडगे यांनी अर्ज दाखल केला होता. त्यांचा एकमेव अर्ज होता. त्यामुळे त्यांची निवड निश्चित होती. उपमहापौरपदासाठी निगडी, प्राधिकरणाचे प्रतिनिधित्व करीत असलेल्या भाजपच्या शर्मिला बाबर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने केवळ उपमहापौरपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आकुर्डीचे प्रतिनिधित्व करीत असलेल्या वैशाली काळभोर यांनी उपमहापौरपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता.

महापौर-उपमहापौरपदासाठी आज शुक्रवारी (६ फेब्रुवारी) निवडणूक प्रक्रिया झाली. सकाळी ११ वाजता नवनिर्वाचित नगरसेवकांची विशेष सभा पार पडली. महापौरपदासाठी रवि यांचा एकमेव अर्ज असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी असलेले सहकार आयुक्त दिपक तावरे यांनी रवि यांची महापौरपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. त्यानंतर उपमहापौरपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली काळभोर यांनी माघारीच्या मुदतीत माघार घेतली. त्यामुळे भाजपच्या बाबर यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. रवि लांडगे २७ वे महापौर तर शर्मिला बाबर याही २७ व्या उपमहापौर झाल्या आहेत.

भोसरीतील ज्ञानेश्वर लांडगे हे महापालिकेचे पहिले महापौर झाले होते. त्यांनी २७ मार्च १९८६ ते १९ मार्च १९८७ असे वर्षभर महापौरपद भूषवले. ते काँग्रेसकडून निवडून आले होते. त्यानंतर पिंपरीगावातील भिकू वाघेरे पाटील, सांगवीतील नानासाहेब शितोळे, आकुर्डीतील कृष्णा उर्फ तात्या कदम, पिंपरीतील कविचंद भाट, पिंपळेसौदागर येथील सादबा उर्फ अप्पासाहेब काटे, पिंपळेनिलख येथील प्रभाकर साठे, निगडीतील आझम पानसरे, भोसरीतील विलास लांडे, फुगेवाडीतील रंगनाथ फुगे, पिंपरीगावातील संजोग वाघेरे पाटील, निगडीतील आर. एस. कुमार, चिंचवडमधील अनिता फरांदे, नेहरूनगर येथील हनुमंत भोसले काँग्रेसकडून महापौर झाले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे पहिले महापौर होण्याचा मान निगडी गावठाणातील मधुकर पवळे यांना मिळाला होता. त्यानंतर पिंपळेगुरव येथील लक्ष्मण जगताप, खराळवाडीतील प्रकाश रेवाळे, संभाजीनगरमधील मंगला कदम, नेहरूनगरमधील डॉ. वैशाली घोडेकर, चिंचवडमधील अपर्णा डोके, संत तुकारामनगर मधील योगेश बहल, भोसरीतील मोहिनी लांडे, पिंपळेगुरव येथील शकुंतला धराडे राष्ट्रवादी काँग्रेसकडून महापौर झाल्या होत्या.

भाजपचा पहिला महापौर होण्याचा मान च-होलीतील नितीन काळजे यांना मिळाला. त्यानंतर चिखलीतील राहुल जाधव, सांगवीतील उषा ढोरे यांनी भाजपकडून महापौरपद भूषवले. ढोरे यांनी २२ नोव्हेंबर २०१९ ते १३ मार्च २०२२ या कार्यकाळात महापौरपद भूषविले. आता भाजपचे चौथे महापौर म्हणून रवि लांडगे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

महापौर झालेले विलास लांडे, दिवंगत लक्ष्मण जगताप हे दोघे आमदार झाले. तत्कालीन हवेली विधानसभा मतदारसंघातून २००४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून आणि २००९ मध्ये भोसरीतून विलास लांडे अपक्ष आमदार झाले होते. लक्ष्मण जगताप हे विधानपरिषदेवर अपक्ष निवडून गेले होते. त्यानंतर २००९ मध्ये चिंचवडमधून अपक्ष विधानसभेवर निवडून गेले. २०१४, २०१९ मध्ये भाजपकडून निवडून गेले होते. आझम पानसरे, संजोग वाघेरे पाटील यांनी लोकसभेची तर, मंगला कदम, हनुमंत भोसले यांनी विधानसभेची निवडणूक लढवली. पण, चौघांनाही अपयश आले.

# पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक

- **पहिल्या दोन तासांत ७.७४ टक्के मतदान; बारामतीत मतदारांमध्ये निरुत्साह**

**पुणे :** पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी मतदानाला सुरुवात झाली असून, पहिल्या दोन तासांत ७.७४ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. बारामतीत मतदारांमध्ये निरुत्साह असून, पहिल्या दोन तासांत अवघ्या ६.५२ टक्के मतदान झाले आहे.

मतदानाला सकाळी साडेसात वाजता सुरुवात झाल्यानंतर पहिल्या दोन तासांत ७.७४ टक्के मतदारांनी मतदान केले. सर्वांत कमी मतदान हे बारामतीमध्ये, तर सर्वांत जास्त मतदान हे भोर तालुक्यामध्ये ८.८९ टक्के झाले आहे.

पुणे जिल्हा हा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला समजला जातो. अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदेचा कारभार अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असताना त्यांच्या अकाली निधनाने निवडणुकीवर दुःखाचे सावट आहे. अशा परिस्थितीत जिल्हा परिषदेच्या ७३ गटांपैकी ५९ गटांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि भाजप हे महायुतीतील दोन मित्रपक्ष समोरासमोर आहेत.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी' एकत्र निवडणूक लढवित आहेत. ७३ गटांपैकी अजित पवारांच्या 'राष्ट्रवादी'चे ७१ उमेदवार आहेत. शरद पवारांच्या 'राष्ट्रवादी'चे सात ठिकाणी उमेदवार आहेत. आंबेगाव, मावळ आणि मुळशी तालुक्यांमध्ये दोन्ही 'राष्ट्रवादी' समोरासमोर आहेत. भाजपचे ५९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

महायुतीतील शिवसेना (शिंदे) पक्षही स्वबळावर निवडणूक लढवित आहे. त्यांनी ३६ ठिकाणी उमेदवार केले आहेत. महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे) हे दोन्ही पक्ष स्वबळावर नशीब आजमावणार आहेत. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे २६ उमेदवार आहेत. याशिवाय काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे), वंचित बहुजन आघाडी, आम आदमी पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष (रासप) आणि बहुजन समाजवादी पक्ष (बसपा) या पक्षांनीही उमेदवार उभे केले आहेत. मात्र, खरी लढत ही अजित पवारांची 'राष्ट्रवादी' आणि भाजप यांच्यामध्ये होण्याची शक्यता आहे.

गेल्या निवडणुकीत तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसने ४४ जागा जिंकून जिल्हा परिषदेवर सत्ता मिळवली. तत्कालीन शिवसेनेला १३, भाजप आणि काँग्रेसला प्रत्येकी सात जागांवर समाधान मानावे लागले होते.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने या वेळेच्या निवडणुकीवर दुःखाचे सावटआहे. त्यामुळे कोणत्याही पक्षांनी जाहीर सभा न घेता मतदारांच्या गाठीभेटी घेऊन प्रचारावर भर दिला.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेवून घरोघरी जाऊन प्रचार करण्याच्या आणि आणि मेळाव्यांवर भर देण्याच्या सूचना केल्या. प्रचारासाठी प्रदेश स्तरावरील मंत्री किंवा पदाधिकारी येणार नसल्याने त्यांनी स्पष्ट केल्याने स्थानिक पातळीवर प्रचार करताना मतदारांच्या गाठीभेटींवर भर देण्यात आला.

# एम्प्रेस गार्डनजवळ ट्रकच्या धडकेत ज्येष्ठाचा मृत्यू

**पुणे :** एम्प्रेस गार्डन परिसरात ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

हरजिंदरसिंग अमरसिंग मक्कर (वय ७०, रा. सिटाडेल सोसायटी, बी. टी. कवडे रस्ता, घोरपडी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी ट्रक चालक आनंद सदोबा गोफणे (वय ३२, रा. इठगा, कलबुर्गी, कर्नाटक) याला अटक करण्यात आली. याबाबत मक्कर यांचा मुलगा तगेंदरजितसिंग (वय ३९) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हरिजिंदरसिंग मक्कर हे गुरुवारी (५ फेब्रुवारी) सकाळी पाचच्या सुमारास फिरायला बाहेर पडले होते. एम्प्रेस गार्डन परिसरात दुचाकीस्वार मक्कर यांना ट्रकने धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या मक्कर यांचा उपचारांपूर्वीच मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक औचरे तपास करत आहेत.

**ऑनलाईन संवाद जरा जपूनच!**

कर्वे रस्त्यावर ६० वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची नुकतीच घडली. ज्येष्ठ महिला मुलासोबत दुचाकीवरुन निघाली होती. सिग्नल सुटल्यावर एका दुचाकीस्वाराने निष्काळजीपणे वाहन वळवताना दुचाकीला धडक दिली. त्यामुळे महिला रस्त्यावर पडली. मागून येणाऱ्या मालवाहू वाहनाचे चाक त्यांच्या अंगावरून गेले. या घटनेत महिलेचा मृत्यू झाला.

# महिलेची छेड काढणारा रिक्षा चालक अटकेत

**पुणे :** महिलेची छेड काढणाऱ्या रिक्षा चालकाला लक्ष्मीनगर पोलिसांनी अटक केली. ख्वाजा नुरुद्दीन टिनमेकर (वय ५४, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका महिलेने लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ३० वर्षीय महिला येरवड्यातील लक्ष्मीनगर परिसरातून निघाली होती. त्या वेळी रिक्षाचालक ख्वाजाने महिलेला अडवून तिची छेड काढली. महिलेने आरडाओरडा केल्यानंतर तो पसार झाला. महिलेने याबाबत तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. पोलीस कर्मचारी जाधव तपास करत आहेत.

दरम्यान, घरासमोर खेळणाऱ्या अकरा वर्षीय मुलीचा विनयभंग करणाऱ्या एकाविरुद्ध येवलेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी एका ३० वर्षीय तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने येवलेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदाराची दहा वर्षांची मुलगी घरासमोर ४ फेब्रुवारी रोजी दुपारी चारच्या सुमारास खेळत होती. त्या वेळी आरोपी तेथे आला. त्याने मुलीशी लगट करण्याचा प्रयत्न केला.

'तू मला आवडते', असे तो तिला म्हणाला. घाबरलेल्या मुलीने या घटनेची माहिती आई-वडिलांना दिली. आरोपीविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारापासून प्रतिबंध कायद्यान्वये (पोक्सो), तसेच विनयभंग केल्या प्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक महाडिक तपास करत आहेत. पुणे शहरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गेल्या वर्षी बलात्काराचे ४७३ गुन्हे, तसेच विनयभंगाचे ८३६ गुन्हे दाखल झाले.

# पिंपरी १० महिन्यात ७०२ कोटींचा मालमत्ता कर जमा; ५४ दिवसांमध्ये २ लाख

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने चालू आर्थिक (२०२५-२६) वर्षातील दहा महिन्यांत ७०२ कोटी ७३ लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. शहरातील सात लाख ३२ हजार २९६ मालमत्ताधारकांपैकी पाच लाख २३ हजार २०९ मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे. आर्थिक वर्षातील ५४ दिवसांमध्ये दोन लाख नऊ हजार ८७ मालमत्ताधारकांकडून कर वसूल करण्याचे आव्हान विभागापुढे आहे.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळे भूखंड, मिश्र अशा सात लाख ३२ हजार २९६ मालमत्ता आहेत. या मालमत्ताधारकांपैकी पाच लाख २३ हजार २०९ मालमत्ताधारकांनी ७०२ कोटी रुपयांच्या कराचा महापालिका तिजोरीत भरणा केला आहे. विभागाला चालू आर्थिक वर्षात एक हजार कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

निवडणुकीच्या दोन महिन्यांच्या कालावधीत करवसुली थंडावली होती. त्यामुळे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी ५४ दिवसांमध्ये करसंकलन विभागापुढे २९८ कोटी रुपये वसूल करण्याचे मोठे आव्हान आहे. ऑनलाइन पेमेंट प्रणाली, तसेच विविध डिजिटल माध्यमांद्वारे नागरिकांना घरबसल्या कर भरण्यासाठी सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यासोबतच, थकबाकीदारांनी कर भरावा, यासाठी त्यांना संदेश, नोटीस व प्रत्यक्ष भेटीद्वारे नियमित पाठपुरावा सुरू केला आहे.

**वाकडमधून सर्वाधिक कर**

वाकड विभागीय कार्यालयाने सर्वाधिक ८७ कोटी ४४ लाख, तर पिंपरीनगर कार्यालयाने सर्वांत कमी पाच कोटी ७८ लाख रुपयांचा कर वसूल केला आहे. थेरगाव कार्यालयाने ६९ कोटी तीन लाख, चिंचवड - ४५ कोटी ४९ लाख, चिखली - ५४ कोटी २७ लाख, कस्पटे वस्ती - ४९ कोटी ९८ लाख, मनपा भवन - ३४ कोटी २१ लाख, भोसरी - ४४ कोटी ९१ लाख, सांगवी - ३५ कोटी २६ लाख, मोशी - ४३ कोटी ५२ लाख, पिंपरी वाघेरे - ४२ कोटी दोन लाख, किवळे - ४७ कोटी ८७ लाख, चऱ्होली - २७ कोटी २१ लाख, निगडी प्राधिकरण - १५ कोटी ६५ लाख, आकुर्डी - ३२ कोटी ९४ लाख, दिघी बोपखेल - २१ कोटी ४० लाख, तळवडे - १७ कोटी ६३ लाख, फुगेवाडी-दापोडी विभागीय कार्यालयाने २८ कोटी १० लाख रुपयांची वसुली केली आहे.

**चार लाख नागरिकांनी भरला ऑनलाइन कर**

आतापर्यंत कर भरलेल्या पाच लाख २३ हजार २०९ मालमत्ताधारकांपैकी चार लाख तीन हजार ६५४ नागरिकांनी ४९२ कोटी ६० लाख रुपयांचा ऑनलाइन कर भरला आहे. विविध पद्धरे २६ हजार ६८९ मालमत्ताधारकांनी २१ कोटी ३९ लाख, रोखीने ५६ हजार २३ जणांनी ५५ कोटी ९० लाख रुपयांचा भरणा केला आहे.

करआकारणी व करसंकलन विभागाने केलेले नियोजनबद्ध काम, नागरिकांचा वाढता सहभाग आणि वेळेत कर भरण्यासाठी देण्यात आलेल्या सवलतींमुळे चालू आर्थिक वर्षात मालमत्ता करात वाढ झाली आहे. उर्वरित मालमत्ताधारकांनीही वेळेत कर भरून शहराच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले आहे. कर भरण्याबाबत जनजागृती मोहीम, थकबाकीदारांविरोधात प्रभावी कारवाई राबविण्यात येत आहे. ज्या नागरिकांनी अद्याप कर भरलेला नाही, त्यांनी पुढील कार्यवाही टाळण्यासाठी तातडीने मालमत्ताकराचा भरणा करावा, असे उपायुक्त सचिन पवार म्हणाले.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

**पुणे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ शांततेत, निर्भय आणि न्याय वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत, सदरचे आदेश जिल्ह्यात ९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अंमलात राहणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी किंवा त्यांच्या हितचिंतक, मुद्रणालयाचे मालक व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना निर्बंध घालण्यात येत आहेत. यामध्ये इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे नमुना मतपत्रिकेसाठी कागद वापरणे तसेच कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिकेची छपाई करणे.

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालये, सर्व तालुका दंडाधिकारी कार्यालये आणि सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय व विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे रस्त्यावर कोणताही राजकीय पक्ष, व्यक्ती, संघटना, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी धरणे आंदोलन, मोर्चा, निर्देशने, उपोषण करणे या बाबी करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

निवडणूक प्रचाराचे साहित्य, सार्वजनिक इमारतीचे ठिकाण, सार्वजनिक रस्त्यावर निवडणूकी संबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेटस, कटआऊटस, होर्डिंग्ज, कमानी आदी रहदारीस अडथळा निर्माण होईल व अपघात होईल अशा पध्दतीने लावण्यावर निर्बंध घालण्यात येत आहे. कोणत्याही राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी, किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणूक प्रचारासाठी १० पेक्षा अधिक मोटार गाड्या, वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यावर निर्बंध घालण्यात येत आहे.

निवडणूक प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावरील निर्बंध: कोणतीही व्यक्ती, संस्था, पक्ष, कार्यकर्ते यांनी ध्वनीक्षेपकाचा वापर पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजेनंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर व कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपणाचा वापर करता येणार नाही तसेच प्रचाराकरीता ध्वनी क्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, फिरणाऱ्या वाहनास रस्त्यावरुन धावत असतांना ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार व इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापरासंबंधीच्या परवानगीबाबत माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीकरिता २९ लाख ७२ हजार मतदार-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

■ **येत्या ७ फेब्रुवारी रोजी मतदानाचा हक्क बजाविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे मतदारांना आवाहन**

**पुणे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ करिता जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र असून याअंतर्गत पुरुष १५ लाख २२ हजार २५६, स्त्री १४ लाख ५० हजार १४ आणि इतर ९१ असे एकूण २९ लाख ७२ हजार ३५९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे, येत्या ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाकरिता जिल्ह्यातील अधिकाधिक मतदारांनी मतदान केंद्रावर जावून मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे.



बारामती तालुक्यात २ लाख ६४ हजार ६४२, मावळ २ लाख ३१६, मुळशी १ लाख ७३ हजार ४०१, शिरुर ३ लाख १ हजार ७८६, हवेली २ लाख ५१ हजार ५३३, दौंड २ लाख ७३ हजार १००, इंदापूर ३ लाख २१ हजार २, पुरंदर १ लाख ८९ हजार ४०३, भोर १ लाख ५४ हजार ८१०, वेल्हे ५५ हजार २३०, आंबेगाव १ लाख ८४ हजार ५२, जुन्नर ३ लाख ७ हजार २६० आणि खेड तालुक्यात २ लाख ९५ हजार ८२४ असे एकूण २९ लाख ७२ हजार ३५९ मतदार आहेत.

बारामती तालुक्यात २९९, मावळ २४३, मुळशी २२७, शिरुर ३३७, हवेली २६३, दौंड ३१७, इंदापूर ४००, पुरंदर २३५, भोर २३७, वेल्हे १०५, आंबेगाव २३९, जुन्नर ३६६ आणि खेड ३३७ तालुक्यात असे एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श व महिला मतदान केंद्र आहेत, अशी माहिती श्री. डुडी यांनी दिलीआहे.

## पुणे ग्रामीण जिल्ह्यात १९ फेब्रुवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू

**पुणे :** पुणे ग्रामीण जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने अपर जिल्हादंडाधिकारी ज्योती कदम यांनी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री १२.०५ वाजल्यापासून ते १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे, दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे, शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारीरिक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणत्याही इसमाच्या चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढाऱ्यांच्या चित्राचे, प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे, मोठ्याने अर्वाच्च घोषणा देणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

सभ्यता अगर नीतिमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, आविर्भाव करणे, कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे, कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पद्धतीने महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) व (३) विरुद्ध वर्तन करणे, कलम ३७ चे पोट कलम (३) अन्वये पाचपेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे तसेच पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या पूर्वपरवानगीशिवाय सभा घेणे किंवा मिरवणूक काढणे यासदेखील प्रतिबंध करण्यात आला आहे.

हा आदेश शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरिष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपूर्तीसाठी हत्यार बाळगणे आवश्यक आहे व त्याबाबत परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## पुरंदर येथे समाज कल्याण विभागांतर्गत राज्यस्तरीय कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे उत्साहात आयोजन

**पुणे :** समाज कल्याण विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शासकीय निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय कला, क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन २ते ६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींची शासकीय निवासी शाळा, दिवे (ता. पुरंदर, जि. पुणे) येथे करण्यात आले आहे.

या स्पर्धांचे उद्घाटन आयुक्त, समाज कल्याण, दीपा मुधोळ मुंडे, यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सह आयुक्त (शिक्षण) प्रमोद जाधव, उपसंचालक (शिक्षण) निशादेवी बंडगर वंदना कोचुरे, तसेच विविध विभागांतील सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, विभागातील अधिकारी-कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

योवळी विविध विभागांतील सहभागी विद्यार्थिनींचे भव्य पथसंचलन झाले. या राज्यस्तरीय स्पर्धेत एकूण २९४ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला आहे. अध्यक्षीय भाषणात आयुक्त दीपा मुधोळ मुंडे यांनी विद्यार्थिनींना स्पर्धेसाठी शुभेच्छा देत खेळामध्ये खिलाडूवृत्ती जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांनी केले.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २३ हजार मनुष्यबळाची नियुक्ती-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६ च्या कामकाजाकरिता जिल्ह्यात १३ तालुक्यात एकूण २३ हजार ११४ मनुष्यबळाची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

बारामती तालुक्यात १ हजार ९४५, मावळ १ हजार ६१२, मुळशी १ हजार ४९५, शिरुर २ हजार १९०, हवेली १ हजार ८००, दौंड २ हजार ६० , इंदापूर २ हजार ६३२ , पुरंदर १ हजार ५३८, भोर १ हजार १९०, वेल्हे ४५०, आंबेगाव १ हजार ५७५, जुन्नर २ हजार ४११ आणि खेड २ हजार २१६ तालुक्यात असे एकूण २३ हजार ११४ मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे.

जिल्ह्यात ३ हजार ६०५ मतदान केंद्र

बारामती तालुक्यात २९९, मावळ २४३, मुळशी २२७, शिरुर ३३७, हवेली २६३, दौंड ३१७, इंदापूर ४००, पुरंदर २३५, भोर २३७, वेल्हे १०५, आंबेगाव २३९, जुन्नर ३६६ आणि खेड ३३७ तालुक्यात असे एकूण ३ हजार ६०५ मतदान केंद्र आहेत. यामध्ये प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे १३ आदर्श व महिला मतदान केंद्र आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार निवारण कक्ष

निवडणुकीच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीवर कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून नागरिकांनी ०२०-२६१२३३७१ हेल्पलाईन क्रमांक तसेच १०७७ या टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री. डुडी यांनी केले आहे.

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी प्रीतीसंगमावर केले स्व. यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**सातारा -** उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज कराड येथील प्रितीसंगमावर महाराष्ट्राचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी स्थळी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर, खासदार सुनील तटकरे, खासदार नितीन पाटील, माजी खासदार श्रीनिवास पाटील, माजी आमदार बाळासाहेब पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, कराडचे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर प्रथमच कराड येथे येऊन स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचे आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधी स्थळाचे नातेही अत्यंत जिव्हाळ्याचे होते. ते वारंवार कराड येथे येऊन स्वर्गीय यशवंतराव चव्हाण त्यांच्या समाधीचे दर्शन घेऊन अभिवादन करत होते.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या संकेतस्थळावर 'बिझीनेस प्रोमोशन' टॅब उपलब्ध

**पुणे :** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या www.udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर व्यवसाय वृद्धी (बिझीनेस प्रोमोशन) स्वतंत्र टॅब उपलब्ध करून देण्यात आला आहे. लाभार्थ्यांनी या सुविधांचा लाभ घेऊन आपली आवश्यक माहिती संकेतस्थळावर अपलोड करावी, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

या सुविधेअंतर्गत लाभार्थ्यांना आपली सेवा, उत्पादने, त्यांची किंमत तसेच वैशिष्ट्यासह व्यवसायाशी संबंधित सविस्तर माहिती पोर्टलवर अपलोड करता येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना व्यवसायाचे नाव, व्यवसायाचा प्रकार, उत्पादने अथवा सेवा, किमती, वैशिष्टे, संपर्क तपशील व इतर आवश्यक माहिती संकेतस्थळावर नोंदविता येणार आहे. या सुविधामुळे लाभार्थ्यांच्या व्यवसायाला व्यापक प्रचार व प्रसिद्धी मिळणार असून त्यांची उत्पादने व सेवा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांच्या व्यवसायाचा विस्तार होण्यास चालना मिळेल, स्थानिक उत्पादने व सेवा ग्राहकता ह उपलब्ध होतील तसेच महामंडळाच्या लाभार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होण्यास मदत होईल.

अधिक माहितीकरिता सचिन खोजे, जिल्हा समन्वयक (९९२११६५५७४३), ज़िल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रास्ता पेठ, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

## रस्ता सुरक्षा जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

■ **शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाअंतर्गत ५० टक्के मृत्यू कमी करण्यावर भर**

**पुणे :** रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासोबतच नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षाविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच सुरक्षित रस्ते वापराची संस्कृती विकसित करण्याच्या उद्देशाने ३७ व्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यावतीने 'रस्ता सुरक्षा जनजागृती व प्रशिक्षण' कार्यक्रम पुणे येथे नुकतेच संपन्न झाले. सन २०३० पर्यंत शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाअंतर्गत ५० टक्के मृत्यू कमी करण्यास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत आयोजित उपक्रम महत्वपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले.

यावेळी अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, वाहतूक शाखेचे उप आयुक्त हिम्मत जाधव, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, इतर अधिकारी तसेच महामार्ग प्रकल्पांशी संबंधित कंत्राटदार, अभियंते, सुरक्षा अधिकारी व विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना रस्ता सुरक्षा शपथ देण्यात आली. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे, वेग मर्यादांचे पालन करणे, हेल्मेट व सीट बेल्टचा वापर करणे, मद्यपान करून वाहन न चालवणे तसेच अपघातग्रस्तांना तातडीने मदत करण्याची जबाबदारी स्वीकारणे याबाबत संकल्प केला. या उपक्रमामुळे रस्ता सुरक्षेबाबत वैयक्तिक जबाबदारीची जाणीव निर्माण होत सुरक्षित वाहतुकीचा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचविण्यात मदत होईल असे नमूद करुन सुरक्षित वाहतूक करणेबाबत जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट केले. त्याच प्रमाणे वाहन चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित वाहन चालविण्याबाबत आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमात रस्ता सुरक्षा व सुरक्षा लेखापरीक्षण, रस्त्यालगतच्या धोक्यांचे व्यवस्थापन, वाहन अपघात प्रतिबंधक संरचना तसेच 'रोडसाईड फर्निचर' या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. केंद्रीय रस्ते वाहतूक संस्था, सेफ्टी फर्स्ट, नवी दिल्ली, ३एम इंडिया लिमिटेड येथील तज्ज्ञांनी सादरीकरणाद्वारे उदाहरणांसह माहिती दिली. गोल्डन अवर्स इन रोड सेफ्टी सत्रात ज्यामध्ये अपघातानंतरचे तातडीचे बचावकार्य, प्रथमोपचार व अग्निशमनाबाबत प्रात्यक्षिकाद्वारे माहिती देण्यात आली. अपघातानंतरच्या पहिल्या काही मिनिटांचे महत्त्व यावेळी प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस उप मुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.